## प्रेस नोट

कॅम्प : यवतमाळ

दिनांक : ०५/०१/२०१९

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) मुकूंद काशिनाथराव कुळकर्णी, वय ४८ वर्षे, पद : पोलीस निरीक्षक, नेमणूक : स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ<br>२) संदीप प्रभाकरराव चव्हाण, वय ३६ वर्षे, पद : सहायक पोलीस निरीक्षक, नेमणूक : स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ<br>३) सुनिल विठठलराव बोटरे, वय ३८ वर्षे, पद : पोलीस नाईक, नेमणूक : आर्थिक गुन्हे शाखा, यवतमाळ |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ०५.०१.२०१९ चे १२.१८ ते १२.४२ वा. दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | २५,००,०००/— रुपये तडजोडीअंती २०,००,०००/— रुपये |
| ५ | स्विकारलेली रक्कम | ५,००,०००/— रुपये (पहिला टप्पा) |
| ६ | घटनास्थळ | चिंतामणी पेट्रोल पंपाजवळ, दारव्हा रोड, यवतमाळ |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक १५.१२.२०१८ रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान स.पो.नि.संदीप प्रभाकरराव चव्हाण, स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी तक्रारदार व त्यांचा यांचे विरुध्द दाखल गुन्हयाचा तकलादू तपास करुन कमजोर चार्जशिट पाठविणे, जप्त असलेला माल सोडणे व अधीक माल जप्त न करणे तंसेच दाखल गुन्हयातील कलमे कमी करणे व त्यांचा भावाकडून घेतलेली शेतीची मुळ खरेदी, १००/— रुपयाचे स्टॅम्पवर केलेली ईसारपावती व चेक परत देण्याकरीता एकुण २५,००,०००/— रुपये व तडजोडीअंती २०,००,०००/— रुपये लाचेची मागणी केली व लाच रकमेपैकी पहीला टप्पा ५,००,०००/— रूपये स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर दिनांक दि.१८/१२/२०१८ रोजी आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान मागणी केलेल्या २०,००,०००/—रुपये लाच रकमेपैकी पहिला टप्पा म्हणून ५,००,०००/— लाच रक्कम स्विकारण्याचा प्रयत्न केला.

तसेच दिनांक २७.१२.२०१८ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान श्री.मुकूंद कुळकर्णी, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ यांनी तक्रारदार व त्यांचा भाऊ यांचेविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाची चार्जशिट कमजोर करुन पाठविणेकरीता व स.पो.नि.चव्हाण यांचेसोबत यापूर्वी ठरल्याप्रमाणे २५,००,०००/— रुपये लाच रकमेपैकी १०,००,०००/— रुपये लाच रक्कम त्यांनी स्विकारल्याचे समजुतीवरुन तक्रारदार व त्यांचा भाऊ यांचेकडून घेतलेले चेक, खरेदीखत परत मिळवुन देण्याकरीता पोलीस कर्मचारी सुनिल बोटरे यांचे मार्फतीने उर्वरीत १५,००,०००/— रुपयापैकी सुरुवातीस १२,००,०००/— रुपये व तडजोडीअंती ११,००,०००/— रुपये लाच रक्कमेची मागणी करुन लाचेचा पहिला टप्पा म्हणून ५,००,०००/— रुपये स्विकारण्याचे मान्य केले व लाच रक्कम श्री.सुनिल बोटरे यांचेकडे देणेस सांगितले.

आज दिनांक ०५.०१.२०१९ रोजी आयोजित करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान श्री. सुनिल बोटरे यांनी आलोसे श्री.मुकूंद कुळकर्णी यांचे करीता मागणी केलेल्या लाच रकमेपैकी पहिला टप्पा ५,००,०००/— रुपये स्विकारतांना ना.पो.कॉ.सुनिल बोटरे यांना रंगेहाथ पकडण्यात आले. नमुद आरोपीविरुध्द पो.स्टे.यवतमाळ शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही श्री.श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती श्री.पंजाबराव डोंगरदिवे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस उपअधीक्षक गजानन पडघन, पो.हवा.श्रीकृष्ण तालन, पो.ना.सुनिल व—हाडे, पो.कॉ.अभय वाघ, पो.कॉ.महेंद्र साखरे, पो.कॉ.शैलेश कडू, पो.ना.चंद्रकांत जनबंधु यांनी पार पाडली. नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क** : अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
मोबाईल क्र. — ९४२०९३०५५५ ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५, २५५३०५५
टोल फ्रि नंबर —१०६४

(गजानन पडघन)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अमरावती